दि.22 जानेवारी,2014

<u>विफल कॉंग्रेस, अराजक एएपी आणि अस्तित्त्वहीन तीस-या मोर्चाचा प्रभाव</u>

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

मागील काही दिवसांच्या घटनेने देशांतील उभरते राजकीय चित्र सुस्पष्ट आणि खोलवर चित्र सादर केले. भाजपाची जी संभावना दिसत आहे ती प्रोत्साहित करणारी आहे.

कॉंग्रेस पक्ष स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या राजकारणावर भारी पडली. मागील काही वर्षात सत्तारुझ युपिए आघाडीचे प्रदर्शन कमजोर आणि प्रेरणाहीन होते. सर्व निवडणुकांमधून संकेत मिळाला की,2014 च्या सामान्य निवडणुकीकडे पाहता लोकप्रियतेत त्यांचे नेते नरेंद्र मोदी यांच्यापेक्षा खुप मागे आहेत. असे वाटते की, अधिकतर राज्यांत कॉंग्रेस आपली ताकद संपुष्टात आणील. असे कदाचितच होईल की, ती 2009 चा आकडा पार करील. जस-जशा निवडणुका जवळ येत आहेत, भाजपाच्या पंखात बळ निर्माण होत आहे ज्यात अधिक शक्ती निर्माण होत आहे. तसेच जे विभाग भाजपाचे गड नाहीत तिथे भाजपाच्या मतांमध्ये पर्याप्त वृद्धि झालेली आहे. तामिळनाडू, ओरिसा, पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेश सारख्या राज्यत जिथे पक्षाची ताकद सीमित होती, तिथे केलेल्या सर्वेक्षणात भाजपाच्या मतांमध्ये वृद्धि झाली आहे. नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान बनवण्याचा आवाज आणखी मोठा होत आहे आणि मते आणखी वाढतील.

भाजपाचे परंपरागत टीकाकार आधी कॉंग्रेस पक्षाच्या अवतीभोवती फिरत होते. असे वाटते की, जसा त्यांचा अपेक्षाभंग झाला आहे आणि आता कुणीच भाजपा किंवा मोदींना रोखू शकत नाही. काही वेळासाठी त्यांना वाटले होते की भाजपाच्या वेगाला आप पक्ष आवर घालील. आम आदमी पक्षाने त्या जुन्या म्हणीची आठवण करुन दिली की, राजकारणात एक सप्ताह खुप मोठा काळ असू शकतो.

त्यांनी अस्वीकार्य आणि गैर-जबाबदार प्रदर्शन केले आहे. एका एसएचओ ची बदली केली जात नाही म्हणून हा पक्ष

त्यांचे अस्वीकार्य आणि बेजबाबदार वक्तव्य बघायला मिळाले आहे. पोलिस अधिका-याची बदली न झाल्यास ते प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी गोंधळ घालणार आहेत. कॉंग्रेस पक्ष या अडचणीत आहे की आप पक्षाचा सामना कशाप्रकारे करावा. तो टीका करण्यासाठी तयार आहे मात्र कारवाई करण्यासाठी नाही. त्यांनी एका आठवड्याची मुदत दिली आहे ती आप ने स्वीकारली आहे. आप पक्षाचे बेजबाबदारपणाचा व्यवहार आणि कॉंग्रेसच्या आत्मसमर्पण वृत्तमुळे अशा पक्षाची जरुरत वाढवेल आणि स्थायी सरकार प्रदान करेल.

वर्तमान परिस्थिती सूचवत आहेत की, लोकसभेच्या येत्या निवडणुकीत केवळ एक पक्ष असेल जो तीन आकडा पार करील. सर्वात पुढे असणारा पक्ष आणि त्याच्यानंतरच्या असणा-या पक्षात महत्त्वपूर्ण असे अंतर असेल. बाकी पक्षाला थोड्या फार जागा मिळतील. मग कोण सरकार बनवेल? हा एक असा प्रश्न आहे ज्याचे उत्तर मतदारांच्या पसंतीची महत्त्वाची भुमिका बजावेल. विविध पक्ष असलेली सरकार बनणे भारताला परवडण्यासारखे आहे का? भारताला जबाबदार शासनाची गरज आहे, जी स्थिरता आणेल आणि आर्थिक विकास करील. गुंतवणूक चक्र पुन्हा एकदा कार्यरत करील अशा सरकारची गरज आहे. या सर्व गोष्टी सर्वात अधिक जागा मिळणा-या पक्षाला फायदेशीर असतील. निष्फळ कॉंग्रेसचा परिणामः आपमध्ये अराजकता व अस्तित्त्वहीन तिसरा मोर्चा आहे. या सर्व गोष्टींची भाजप आणि मोदी यांना पुढे आणण्यास मदद होईल.